मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी महापालिकेकडून मालमत्ता कराची २०० कोटींची थकबाकी वसूल!

## आता जप्त मालमत्तांचा करण्यात येणार लिलाव

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने थकीत कर वसूल करण्यावर भर दिला आहे. २०२३-२४ चालू आर्थिक वर्षातील साडेसहा महिन्यात २०१ कोटी रुपयांची जुनी थकबाकी वसुली केली आहे. ४१ हजार ३०७ जणांना जप्ती नोटीसा तर ३६ हजार ७१९ मालमत्ता धारकांना जप्ती पत्रे धाडली आहेत. जप्त मालमत्तांचा आता लिलाव करण्यात येणार आहे. शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा सहा लाख सात हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभाग कर वसूल करत आहे. आतापर्यंत



६०४ कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात आला आहे. आता थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यासाठी तीव्र मोहीम हाती घेण्यात आली असून थकबाकीदार तत्काळ थकीत कर भरत आहेत. शहरातील मालमत्ता धारकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी होती. थकबाकी वसूल होत नसल्याने दरवर्षी हा आकडे वाढतच होता. त्यामुळे जुनी थकबाकी वसूल करण्यावर भर दिला. थकबाकीदारांचा चालू कर आणि थकीत कर भरण्याकडे कल वाढत असल्याने २०२२-२३ आणि २०२३-२४ मध्ये आतापर्यंत ५५५ कोटी रुपयांची जुनी थकबाकी वसूल केली आहे. यामध्ये प्रामुख्याने निवासीसह बड्या थकबाकीदार बिगर निवासी मालमत्ता धारकांकडून कर वसूल केला आहे. कर संकलन विभागाने ४१ हजार ३०७ जणांना जप्ती नोटीसा तर ३६ हजार ७१९ मालमत्ता धारकांना जप्ती पत्रे धाडली आहेत. या मालमत्ता धारकांकडे ६०० कोटी रुपयांचा कर थकीत असल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

जप्त मालमत्तांचा लिलाव करण्यात येणार आहे. जप्ती मोहीम कशा पद्धतीने राबवता येईल याचा कालबद्ध कार्यक्रम आखून देण्यात आला आहे. शहरात चालू असलेले सर्वे क्षण महापालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत क्रांतिकारी ठरणार आहे. त्यात कुठल्या त्रुटी राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी सांगितले.

### ४१ हजार ३०७ जणांना नोटीस

» थकबाकी वसूल होत नसल्याने दरवर्षी हा आकडे वाढतच होता. त्यामुळे जुनी थकबाकी वसूल करण्यावर भर दिला. थकबाकीदारांचा चालू कर आणि थकीत कर भरण्याकडे कल वाढत असल्याने २०२२-२३ आणि २०२३-२४ मध्ये आतापर्यंत ५५५ कोटी रुपयांची जुनी थकबाकी वसूल केली आहे. यामध्ये प्रामुख्याने निवासीसह बड्या थकबाकीदार बिगर निवासी मालमत्ता धारकांकडून कर वसूल केला आहे. कर संकलन विभागाने ४१ हजार ३०७ जणांना जप्ती नोटीसा तर ३६ हजार ७१९ मालमत्ता धारकांना जप्ती पत्रे धाडली आहेत.

# रस्त्यांच्या आगाऊ ताब्यासाठी २६,२७ ऑक्टोबरला शिबीर!

## आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

चिखली व तळवडे भागातील ७ रस्त्यांच्या आगाऊ ताब्यासाठी महापालिका नगररचना विभागाकडून दि.२६ व दि.२७ ऑक्टोबर २०२३ रोजी शिबिराचे आयोजन केले आहे, अशी माहिती महापालिका नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड यांनी दिली. भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे हे गेले वर्षभर चिखली व तळवडे भागातील ७ रस्त्यांचे आगाऊ ताब्यासाठी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. त्यासाठी मनपातर्फे दि. २६ व दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चिखली गावठाणमधील मनपा शाळा मुले व मुली तसेच तळवडे गावठाणमधील मनपा शाळा मुले व मुली येथे शिबिराचे आयोजन केले आहे. मौजे चिखली व तळवडे येथील मंजूर विकास योजनेतील खालीलप्रमाणे ७





रस्त्यांच्या आगाऊ ताब्याची कार्यवाही भूसंपादन कायदा २०१३ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत सुरू आहे. तर काही रस्त्यांची भूसंपादनाची कार्यवाही लवकरच सुरू होणार आहे. चिखली येथील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय ते संतपीठकडे जाणारा १२ मी/१८ मीटर रुंद डी.पी. रस्ता (रस्त्याची लांबी १३७० मीटर). चिखली येथील साने चौक ते चिखली गाव १२मी, २४मी व ३०मी रुंद रस्ता (रस्त्याची लांबी २०३० मीटर). चिखली येथील देहू आळंदी ते सोनावणे वस्तीकडे जाणारा ३० मी रुंद डी. पी. रस्ता (रस्त्याची लांबी २२५० मीटर). चिखली येथील चिखली चौक ते सोनावणे वस्तीकडे जाणारा २४मी रुंद रस्ता (रस्त्याची लांबी २००० मीटर). तळवडे येथील त्रिवेणीनगर चौक ते तळवडे चौकापर्यंत २४ मी रुंद उर्वरित रस्ता (रस्त्याची लांबी ४०० मीटर). तळवडे येथील तळवडे कॅनवे चौक ते निगडी स्पाईन रस्त्याला जोडणारा १८ मी डी.पी. रस्ता तळवडे येथील नदीच्या कडेने जाणारा १२.००मी रस्ता व चिखली तळवडे शीवेवरील २४.०० मी. रस्ता (रस्त्याची लांबी २१०० मीटर). या रस्त्यांच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली आहे.

# मराठा समाजाच्या आरक्षण मागणीसाठी एकनाथ पवारांचा भाजपला 'जय महाराष्ट्र'

## भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा एकनाथ पवारांनी दिला राजीनामा

**मावळ। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा समाजाच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी भाजपच्या प्रदेश प्रवक्ते आणि प्राथमिक सदस्यत्व पदाचा राजीनामा देत ज्येष्ठ नेते एकनाथ पवार यांनी भाजपला जय महाराष्ट्र केला आहे. रविवारी (दि.२२) पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना एकनाथ पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोन मातब्बर मराठा नेत्यांवर निशाणा साधला. एकनाथ पवार म्हणाले की, जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजातील युवक रस्त्यावर उतरून आंदोलन करीत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार,



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोघेही मराठा समाजाचे नेते असतानाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शेजारी बसून तमाशा बघण्याची भूमिका घेत आहेत. आपले न्याय हक्क मागणीसाठी रस्त्यावर उतरलेला महाराष्ट्रातील मराठा समाज त्यांना कदापि माफ करणार नाही. महाराष्ट्रात आणि केंद्रात भाजपची सत्ता असताना मी सत्तेचा कुठलाही लोभ न ठेवता राजीनामा देत आहे. माझी राजकीय भूमिका मी २७ तारखेला पुन्हा जाहीर करेल. जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी ९ सप्टेंबर रोजी पिंपरी चिंचवड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे पिंपरी चिंचवड शहर बंद असताना झालेल्या सभेत मी या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा जाहीर केला होता. त्याच वेळी मी भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन जरांगे पाटील यांच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेईल असे जाहीर केले होते. मागील काळात भारतीय जनता पार्टीचा एक कार्यकर्ता म्हणून काम करीत असताना माझ्यावर विविध आंदोलनाचे किमान १०० गुन्हे दाखल झाले आहेत. मी सामान्य शेतकरी कुटुंबातून शहरात नोकरी निमित्त आलो. पक्षाने मला विविध पदांवर काम करण्याची संधी दिली तसेच २०१४ मध्ये विधानसभा लढण्याची देखील मला संधी मिळाली. पक्षाच्या विविध प्रदेशाध्यक्षांबरोबर मला काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी पक्षाच्या सर्व नेत्यांचे आभार व्यक्त करतो.

जरांगे पाटील यांनी सरकारला ४० दिवसांचा अल्टीमेटम दिला असतानाही सरकार वेळकाढू पणाची भूमिका घेत आहे. उरलेल्या दोन दिवसात आई तुळजाभवानी या सरकारला राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत निर्णय घेण्याची सद्बुद्धी देवो अशी प्रार्थना मी देवीचरणी करत असल्याचे एकनाथ पवार यांनी यावेळी सांगितले.

# नवरात्रोत्सवात भोंडला, थुंकीमुक्त रस्ता अभियान!

## पर्यावरण संवर्धनावर आधारित पथनाट्य अशा विविध उपक्रमांचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या लिटल फ्लॉवर इंग्लिश मीडियम स्कुल, भारतीय विद्यानिकेतन, ज्युनिअर कॉलेज व लिटल फ्लॉवर प्री प्रायमरी स्कुलमध्ये शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त भोंडला, सांगवी परिसरातील विविध मंडळामध्ये 'थुंकीमुक्त रस्ता अभियाना'ची जनजागृती, देवीची आरती, पर्यावरण संवर्धनावर आधारित पथनाट्य अशा विविध उपक्रमांचे आयोजन



करण्यात आले होते. परंपरेनुसार हत्तीच्या मूर्तीचे व रेखाटन केलेल्या हत्तीच्या चित्राचे पूजन संस्थेच्या अध्यक्षा आरती राव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव प्रणव राव, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सांगवी व पिंपळे गुरव परिसरातील नवरात्रौत्सव मंडळाच्या समोर विद्यार्थ्यांनी 'थुंकीमुक्त रस्ता अभियाना'ची जनजागृती केली. तसेच पर्यावरण संवर्धनावर आधारित पथनाट्य सादर केले. विद्यार्थिनींबरोबर शिक्षिकांनीही गाण्याच्या तालावर गरबा नृत्य केले. तसेच वेगवेगळे दांडिया प्रकार सादर केले. प्रशालेतील सर्व विद्यार्थिनींनी आकर्षक रंगीबेरंगी पोशाखामध्ये दांडियाचा आनंद लुटला. तसेच विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करण्यात आला. तसेच आलेल्या सुवासिनींना सौभाग्याचं लेणं म्हणून अरविंद एज्युकेशन सोसायटी तर्फे बांगड्या भरण्यात आल्या व विद्यार्थिनींनी मेहंदी देखील काढली.

जुनी सांगवीतील शितोळेनगर नवरात्रौत्सव मंडळ, पिंपळे गुरवमधील विद्यानगर महिला मंडळ, तुळजाई महिला मंडळ आणि सांगवी प्रतिष्ठानच्या देवीची महाआरती अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा आरती राव यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी शितोळेनगर क्रीडा मित्रमंडळाचे अध्यक्ष अजय शितोळे, कार्याध्यक्ष अतुल शितोळे, विद्यानगर महिला मंडळाच्या अध्यक्षा नंदा अहिरे, तुळजाई महिला मंडळाच्या अध्यक्षा पूनम भदाणे, सांगवी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश काची आदी उपस्थित होते.

# बस डेपो आणि पार्किंगसाठी पीएमआरडीएकडे जागेची मागणी!

## पीएमपीला लाखो रूपयांचे भाडे पीएमआरडीएला द्यावे लागते

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) डेपो व बस पार्किंगसाठी आवश्यक असलेल्या आणि सध्या वापरात असलेल्या तीन जागा देण्याची मागणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) केली आहे. या जागा मिळाल्यास पीएमपीकडून लाखांमध्ये दिले जाणार भाडे वाचणार आहे. पुणे, पिंपरी चिंचवड आणि पुणे महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडी) हद्दीत पीएमपीकडून सार्वजनिक सेवा दिली जाते. पीएमपीकडून पीएमआरडीए हद्दीत ११३ मार्गावर ४९० बसमार्फत सेवा दिली जाते. या सेवेच्या बदल्यात पीएमआरडीएने गेल्या वर्षी १०० कोटी रूपये दिले आहेत. पीएमपीकडून पीएमआरडीएच्या काही जांगाचा पार्कींग, डेपोसाठी वापर केला जात आहे. पण, बदल्यात पीएमपीला लाखो रूपयांचे भाडे पीएमआरडीएला द्यावे लागत आहे. त्यामुळे पीएमपीने मोशी, भोसरी आणि रावेत येथील जागा देण्याची मागणी पीएमआरडीए कडे केली आहे. या जागा पीएमपीला मिळाल्यास महिन्याला लाखो रूपये वाचणार आहेत. या मागण्यांवर पीएमआरडीए कडून विचार सुरू आहे.



पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपीची सेवा मोठ्या प्रमाणात दिली जाते. अनेक नागरिक पीएमआरडीएच्या हद्दीत राहून नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने शहरात येतात. त्यामुळे पीएमपीच्या ४९० बस पीएमआरडीएच्या हद्दीत चालतात. भविष्यात पीएमआरडीच्या हद्दीत डेपो उभारणी करण्यात येणार आहेत. त्यासाठी नऊ ठिकाणी जागा देण्याची मागणी पीएमपीने केली आहे. एक जागा किमान पाच एकरपर्यंत असावी म्हणजे त्या ठिकाणाहून डेपो सुरू करणे शक्य होईल, असे म्हटले होते.

### महिन्याला लाखो रूपये वाचणार

» पीएमपीकडून पीएमआरडीएच्या काही जांगाचा पार्कींग, डेपोसाठी वापर केला जात आहे. पण, बदल्यात पीएमपीला लाखो रूपयांचे भाडे पीएमआरडीएला द्यावे लागत आहे. त्यामुळे पीएमपीने मोशी, भोसरी आणि रावेत येथील जागा देण्याची मागणी पीएमआरडीएकडे केली आहे. या जागा पीएमपीला मिळाल्यास महिन्याला लाखो रूपये वाचणार आहेत. या मागण्यांवर पीएमआरडीएकडून विचार सुरु आहे. पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपीची सेवा मोठ्या प्रमाणात दिली जाते. अनेक नागरिक पीएमआरडीएच्या हद्दीत राहून नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने शहरात येतात. त्यामुळे पीएमपीच्या ४९० बस पीएमआरडीएच्या हद्दीत चालतात. भविष्यात पीएमआरडीच्या हद्दीत डेपो उभारणी करण्यात येणार आहेत.

# शिका, नेतृत्व करा आणि बदल घडवा या ब्रीदवाक्यानुसारच आम्ही कार्यरत!

## शरद पवार यांच्यासमोर अजित पवार यांची टिप्पणी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** 'शिका, नेतृत्व करा आणि बदल घडवा' हे विद्या प्रतिष्ठानचे ब्रीदवाक्य आहे आणि ब्रीदवाक्यानुसारच आम्ही काम करत आहोत, अशी टिप्पणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासमोर केली तेव्हा सर्वांच्या भुवया उंचावल्या. विद्या प्रतिष्ठानच्या दौंड येथील अनंतराव पवार इंग्लिश मिडियम स्कूलच्या इमारतीचा उद्घाटन सोहळा शरद पवार, अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत झाला. त्याप्रसंगी अजित पवार यांनी हे भाष्य केले. कोणतेही राजकीय भाष्य करण्याचे टाळून अजित पवार यांनी शरद पवार यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी संस्थेची प्रगती विषद केली. शरद पवार यांच्या समोरच त्यांनी कर्मचाऱ्यांना दम देऊन चांगले काम करण्याच्या सूचना केल्या. अजित पवार म्हणाले की, पवार



साहेबांनी शेती क्षेत्रासाठी कृषी विकास प्रतिष्ठानची आणि शिक्षणाकरिता विद्या प्रतिष्ठानची स्थापना केली. पुणे आणि पुणे जिल्ह्यामध्ये या संस्थेचे मोठे जाळे आहे. इंदापूरमध्येही शाळेची शाखा सुरु झाल्याने ही इंग्रजी माध्यमाची शाळा आम्ही पवार साहेबांच्या माध्यमातून सुरू केली. गुणवत्ता जोपासण्यासाठी आणि गरीबांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी आम्ही सगळेजण प्रयत्न करत असतो. अनंतराव पवार इंग्रजी माध्यम शाळेच्या इमारतीचे एक लाख चौरस फुटांचे बांधकाम झालेले आहे. अनंतराव पवार यांच्या नावाने ही शाळा आहे. त्यांच्या नावाला साजेसे शिक्षण येथे दिले गेले पाहिजे. जर कुणी कमी पडले तर माझ्याशी गाठ आहे. येथे शिक्षण घेणारा विद्यार्थी लाथ मारीन तिथे पाणी काढेल, असा घडला पाहिजे, असा दम अजित पवारांनी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना भरला. शरद पवार म्हणाले की, १९७२ साली संस्था काढली, सध्या संस्थेत ३२ हजार विद्यार्थी आहेत. त्यातील १५ हजार मुली आहेत. संस्थेचे अनेक वसतिगृहे आहेत. शाळेतील मुले जगाच्या पाठीवर जाऊन नाव कमावत आहेत. कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे सर्व क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल होत आहेत. तुमच्या उसामध्ये किती साखर आहे.

# कर्मचाऱ्यांच्या दिवाळी बोनस बिलात चूक!

## १८ हजार कर्मचाऱ्यांना फटका, पुणे पालिकेचा मोठा निर्णय




**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पालिकेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही कर्मचाऱ्यांसाठी बोनस, सानुग्रह अनुदानाची घोषणा केली. त्यासाठीचे कामकाजही सर्व विभागांनी सुरू केले. मात्र, सातव्या वेतन आयोगाऐवजी सहाव्या वेतन आयोगानुसार बोनस बिले तयार केली गेल्याने बोनससाठी पुन्हा बिल तयार करण्याची नामुष्की महापालिकेवर ओढावली आहे.

महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना दरवर्षी दिवाळीला बोनस दिला जातो. यामध्ये मूळ वेतन, महागाई भत्याच्या रकमेवर ८.३३ टक्के बोनस, २१ हजार रुपये सानुग्रह अनुदान याचा समावेश आहे. प्रशासनाने काढलेल्या परिपत्रकानुसार प्रत्येक कर्मचाऱ्यास जवळपास वेतना इतकीच रक्कम मिळते. यंदा बोनसची रक्कम लवकरात लवकर कर्मचाऱ्यांच्या हाती पडावी, यासाठी लेखा व वित्त विभागाने बोनसची बिले काढण्याचा आदेश ९ ऑक्टोबर रोजीच काढला होता. एक तारखेनंतर लगेच हे पैसे बँक खात्यात जमा करण्याचा पालिकेचा प्रयत्न होता. मात्र, त्याला यश आलेले नाही. सर्वच विभागांमध्ये हा प्रकार घडल्याने सुमारे १८ हजार कर्मचाऱ्यांना बोनस देण्यासाठी पुन्हा नव्याने बिले तयार करण्यात येत आहेत. गेल्यावर्षीपासून महा पालिकेच्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला. बोनसची बिले काढताना या वेतन आयोगानुसार कार्यवाही करणे आवश्यक होते. पण सर्वच विभागांकडून सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनानुसार बोनसची बिले तयार केली गेली. पण बोनसची रक्कम कमी असल्याचे लक्षात आल्यानंतर बिलांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ही चूक झाल्याचे निर्दशनास आले.सातव्या ऐवजी सहाव्या वेतन आयोगानुसार बोनस बिल काढल्याने प्रत्येकाच्या बोनसमध्ये १० हजार ते २० हजार रुपयांपर्यंत तफावत दिसत आहे. त्यामुळे आता पुन्हा नव्याने बोनसची बिले तयार करण्याचे काम सुरु झाले आहे. त्यामुळे बोनस जमा होण्यासही विलंब होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### पुन्हा नव्याने बिले तयार

» एक तारखेनंतर लगेच हे पैसे बँक खात्यात जमा करण्याचा पालिकेचा प्रयत्न होता. मात्र, त्याला यश आलेले नाही. सर्वच विभागांमध्ये हा प्रकार घडल्याने सुमारे १८ हजार कर्मचाऱ्यांना बोनस देण्यासाठी पुन्हा नव्याने बिले तयार करण्यात येत आहेत. गेल्यावर्षीपासून कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला. बोनसची बिले काढताना या वेतन आयोगानुसार कार्यवाही करणे आवश्यक होते. पण सर्वच विभागांकडून सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनानुसार बोनसची बिले तयार केली गेली.

# बारामतीतही मिळकत धारकांसाठी लॉटरी योजना राबवा!

## मुख्य मंदिर दुरुस्तीच्या कामासाठी दीड महिन्यापासून ठेवण्यात आले होते बंद



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे महानगरपालिका क्षेत्रात सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात मुदतीत मिळकत कर भरलेल्या नागरिकांसाठी लॉटरी योजना राबवून विजेत्या मिळकतधारकांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. त्याप्रमाणे बारामती नगरपरिषदेनेही कार्यवाही करावी अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केली. अजित पवार यांनी रविवारी (ता. २२) विविध विकासकामांची पाहणी करुन प्रशासनाला विविध सूचना केल्या. आगामी काळातील वीजेची गरज लक्षात घेत या पुढे तालुक्यातील प्रत्येक नवीन शासकीय इमारतीचे नियोजन करताना त्यामध्ये सौर पॅनेलचा समावेश करा, असे निर्देशही त्यांनी दिले. बारामती परिसरातील मेडद येथील आयुर्वेदिक महाविद्यालय, नवीन प्रशासकीय इमारतीसमोरील अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ग्रंथालय, जळोची उपबाजार येथील कृषी उत्पन्न बाजार समिती निर्यात केंद्र व कार्यालयीन इमारत, जवाहरबाग ते परकाळे बंगला येथील कालव्याचे सुशोभीकरणाची सुरु असलेल्या विविध विकास कामांची पाहणी केली. पवार म्हणाले, नवीन प्रशासकीय भवन शेजारी उभारण्यात येणाऱ्या अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयाचे काम वेळेत पूर्ण करावे. इमारतीचा परिसर स्वच्छ करुन घ्यावा. नवीन कारागृहाची कामे लवकर सुरु करावीत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाअंतर्गत ग्रंथालयाच्या इमारतीचे काम शैक्षणिक क्षेत्राला शोभेल असे आणि ग्रंथालयात पुरेसा सुर्यप्रकाश, हवा खेळती राहील याची काळजी घेऊन करा.